सकाळ



आजरा : जळीतग्रस्त अमर सुतार यांना मदत देताना एम.एल चौगुले. शेजारी शिवाजी सुतार, प्रा. मायदेव, महेश मजती, संभाजी हरेर.

# आजऱ्यातील जळीतग्रस्तांना 'रवळनाथ'कडून २५ हजारांची मदत

उत्तूर : आजरा येथील जळीतग्रस्त अमर शिवाजी सुतार यांना श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फायनान्स सोसायटीकडून २५ हजारांची मदत दिली. देण्यात आली. शनिवारी (ता. १८) पहाटे सुतार गल्लीतील अमर सुतार यांच्या घराला आग लागून संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले. 'रवळनाथ'चे अध्यक्ष एम. एल. चौगुले, उपाध्यक्ष मायदेव संचालक महेश मजती यांनी सुतार कुटुंबीयांना घर उभारण्यासाठी २५ हजारांची मदत दिली. गौतम सुतार, शिवाजी सुतार, संभाजी हरेर आदी उपस्थित होते.

Kolhapur, Main
21/06/2022 Page No. 3